Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 3 | Sept – 2015


# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्योध्दाराचे कार्य




**ज्योती एस. अनिरूध्द,**
**इतिहास विभाग प्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे**

## सारांश:

दि.२३ एप्रिल १८७३ मध्ये कर्नाटकातील जमखंडी येथे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म झाला. इ.स.१८९१ मध्ये मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर जमखंडी हायस्कूलमध्ये अध्यापक म्हणून त्यांनी काम केले. पुढे इ.स. १८९३ ते १८९८ या काळात पुणे येथील फर्गसन महाविद्यालयात शिक्षण घेऊन ते इ.स. १८९८ मध्ये बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्याच वर्षी पुणे येथेच त्यांनी प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. मध्यंतरी इ.स.१८९५ मध्ये पुणे येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात स्वयंसेवक म्हणून त्यांनी काम केले. प्रार्थना समाजिस्टांमुळे इ.स. १९०१ ते १९०३ या काळात मँचेस्टर येथील ऑक्सफर्ड विद्यापीठात शिक्षण, तौलनिक धर्मशास्त्र, भाषाशास्त्र इ. विषयांचा अभ्यास करण्याची संधी शिंदेंना मिळाली. इ.स.१९०३ मध्ये भारतात परतल्यानंतर त्यांनी मुंबई प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून काम सुरू केले. याच वर्षी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या विनंतीवरून बडोदे संस्थानातील अस्पृश्य वर्गांसाठीच्या शैक्षणिक कार्याची त्यांनी पाहणी केली. यावेळी अस्पृश्यांना शिक्षण देण्याबरोबरच नोक-याही देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. इ.स.१९०३ ते १९०६ या काळात भारतभर दौरा करून अस्पृश्यांच्या जीवनाची त्यांनी पाहणी केली.




मे १९०५ मध्ये अहमदनगर जवळील भिंगार ह्या गावी श्रीपतराव थोरात व पांडुरंग लक्ष्मण डांगळे इत्यादी अस्पृश्य पुढा-यांनी मध्यरात्री भरवलेल्या अस्पृश्य वर्गाच्या सभेचे दृष्य पाहून महर्षी शिंदे यांचे अंत:करण हेलावले व त्या रात्रीच त्यांनी अस्पृश्योध्दाराच्या कार्याला वाहून घेण्याची शपथ घेतली. नंतर मुंबईस परतल्यावर त्यांच्या मनातली अस्पृश्योध्दाराची कल्पना मुंबईच्या प्रार्थना समाजाला व सुधारणा मंडळाला त्यांनी समजावून सांगितली. त्यासाठी सामाजिक सुधारणा मंडळापुढे (सोशल रिफॉर्म असोशिएशन) इ.स.१९०६ मध्ये त्यांनी इंग्रजीत एक व्याख्यान दिले. त्या व्याख्यानाची एक पुस्तिका प्रसिध्द केली. त्या पुस्तिकेत हिंदुस्थानातील बहिष्कृत वर्गाच्या अडचणी, त्यांची प्रांतवार रचना, वरीष्ठ वर्गाकडून होणारे सुधारणेचे प्रयत्न, त्यांचे स्वउध्दारार्थ होणारे प्रयत्न यांची त्यांनी व्यवस्थित मांडणी केली.[1]

या उद्देशानेच म.शिंदे यांनी १८ ऑक्टोबर १९०६ या दिवशी मुंबई येथे 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' म्हणजेच 'निराश्रीत सहाय्यकारी मंडळी'ची स्थापना केली. या संस्थेची पायाभूत तत्वे म्हणजे 'बंधुता व सामाजिक न्याय' ही होती. ही दोन्ही तत्वे म.शिंदेंच्या आवडत्या उदार धर्माची तत्वे होती. अस्पृश्योध्दारासाठी व्यापक पातळीवर प्रयत्न करण्यासाठी त्यांनी ही संस्था स्थापन केली होती. त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात बारामतीचे एक गृहस्थ रामचंद्र कृष्ण कळसकर यांनी अस्पृश्यांमध्ये अत्यंत तळमळीने केलेले प्रयत्न त्यांच्या पाहण्यात आले. कळसकरांच्या या कार्याचा शिंदेंच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला आणि पुढील काळात त्यांनी वरील संस्था स्थापन करून अस्पृश्यांमध्ये शिक्षण-प्रसाराचे कार्य हाती घेतले. अस्पृश्यांचा उध्दार शिक्षणाशिवाय नाही हे त्यांनी जाणले होते. उदार धर्मप्रसाराच्या कार्यासाठी इ.स.१९०१ ते १९०३ या काळात ते इंग्लंडमध्ये गेले असता तेथील मिशन-यांच्या बहुउद्देशीय कार्याने देखील ते प्रभावित झाले होते. इंग्लंडमधील हे मिशनरी गरीब वर्गासाठी विविध उपक्रम चालवित असत. संपूर्ण अस्पृश्यतेचे उच्चाटन हे त्यांच्या 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'चे ध्येय होते. या संस्थेअंतर्गत त्यांनी वसतिगृहे, शाळा, मोफत दवाखाने इ. स्थापन केले. यामध्ये स्पृश्य व अस्पृश्य या दोन्ही समाजाच्या सदस्यांनी एकत्र येवून आपला अहंभाव विसरून कामे करावीत तसेच मागासवर्गातील लोकांना प्रगत समाजातील लोकांच्या चांगल्या सवयी लागाव्यात हे यामागील महत्वाचे हेतू होते त्यासाठी या शाळांमधील शिक्षक व इतर कार्यकर्त्यांनी अस्पृश्यासाठी काम करताना त्यांच्या वस्तीमध्ये जाऊन राहणे जरूरीचे ठरवले गेले. अस्पृश्यांच्या वसतिगृहांमध्ये १/४ स्पृश्य

विद्यार्थ्यांनाही प्रवेश दिला जाई, जेणेकरून स्पृश्य-अस्पृश्य सहजीवनाचा त्यांना पाठ मिळेल. या सहजीवनामुळे स्पृश्य व अस्पृश्य विद्यार्थ्यांचा स्वजातीबद्दलचा दुराभिमान व परजातीबद्दलचा द्वेष काढून टाकण्याचे पध्दतशीरपणे प्रयत्न केले जात असत.

मिशनच्या दवाखान्यातून अस्पृश्य जातींबरोबरच इतर जातीच्या लोकांनाही एकत्रितपणे वैद्यकीय सेवा देण्यात येत असे. मिशनचे कार्यकर्ते अस्पृश्यांच्या घरांना भेटी देवून बाळंतपणातील सेवा, आजा-यांची शुश्रूषा आणि धार्मिक सेवा जसे भागवत धर्माच्या पुराणांचे पठण करून उदार धर्माच्या तत्वांचा त्यांच्यामध्ये प्रसार करणे इ. कामे करीत. म.शिंदेंनी मिशनचे कामकाज चालवण्यासाठी तांदूळभत्ता, कपडाभत्ता व रूपयाभत्ता याव्दारे फक्त सामग्री व पैसाच गोळा केला नाही तर समाजातील विविध थरांतील इतर लोकांकडून अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यास सहानुभूतीही मिळवली. अशाप्रकारे आर्थिक मदतीबरोबरच जनमत तयार करण्यावरही शिंदेंचा भर होता. अक्षरी शिक्षणाबरोबरच सुतारकाम, रंगकाम, बुकबाईंडींग, लेदरकाम, विणकाम, इ. कौशल्याची कामे अस्पृश्यांना शिकवून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याबरोबरच त्यांच्या परंपरागत असलेल्या सक्तीच्या कामाच्या जाचातून त्यांची मुक्तता करण्याचाही विचार यामागे होता. सामाजिक, बौध्दिक व आर्थिक विकासाबरोबरच अस्पृश्यांच्या सांस्कृतिक व धार्मिक विकासासाठी त्यांना 'उपासना'ही शिकवली. मुंबई, पुणे, सातारा व कोल्हापूर या ठिकाणी धार्मिक परिषदा आयोजित केल्या. इ.स.१९०८ मध्ये जेव्हा डिप्रेस्ड क्लासेस मिशनला 'ऑल इंडिया थिईस्टिक परिषदे'ची मेंबरशिप मिळाली, तेव्हापासून डिप्रेस्ड क्लासेस मिशनची धार्मिक कार्यातील स्थिती सुधारलेली दिसते.[२]

म.शिंदे याच्या मिशनने पहिल्या तीन वर्षात मुंबईमध्येच परळ, देवनार, मदनपुरा येथे मराठी शाळा काढल्या. रविवारच्या शाळा काढल्या. भजन समाज, व्याख्याने असे उपक्रम सुरू केले. जर्मन तज्ञांच्या मदतीने नवीन त-हेने बूट बनवण्याचा कारखाना काढला. निराश्रीत स्त्रियांसाठी सेवासदन उभारले, दवाखाना, विद्यार्थी वस्तीगृहे उघडली. मुंबईबाहेर पुणे, मनमाड, इगतपुरी, इंदूर, अकोला, अमरावती तसेच दापोली, मंगरूळ, मद्रास, महाबळेश्वर, इ. ठिकाणी शाळा उघडल्या. मिशनच्या इ.स.१९०९ पर्यंत १२ शाखा, दिवसाच्या १२ शाळा व चार उद्योगशाळा काढल्या. त्यामध्ये १,०१८ विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले.[३]

इ.स. १९१२ पर्यंत मिशनचे काम मुंबई, मद्रास व मध्य प्रांतात मोठया प्रमाणावर पसरले होते. यावेळेपर्यंत मिशन प्रार्थना समाजापासून वेगळी झाली होती. मुंबईत मिशनची मूळ शाखा म्हणजेच मातृसंस्था होती. तिला संलग्न शाखा पुणे व हुबळी येथेही स्थापन झाल्या. या तीन मुख्य शाखांना वर नमूद केलेल्या अन्य शाखा जोडण्यात येवून संस्थेचे जाळे ब-याच मोठ्या भूभागावर पसरले. कोल्हापूरातील मिस क्लार्क बोर्डींगदेखील संस्थेच्या अंतर्गतच होते. या सर्व शाखांमधील कारभारात एकसूत्रता आणण्यासाठी तसेच फंड उभारण्यासाठी म.शिंदे शहरोशहरी फिरत असत. त्यांच्या या अथक प्रयत्नांना इ.स. १९१० पर्यंत हयात असलेले त्यांचे आई-वडील, भगिनी जनाक्का, पत्नी रूक्मिणी, तसेच मित्र सय्यद अब्दुल कादर, वामनराव सदाशिव सोहोनी, ए.के.मुदलीयार, डी.एन.पटवर्धन, न्या. रानडेंचे बंधू श्रीधर रानडे यांची पत्नी लक्ष्मीबाई, अस्पृश्य नेते शिवराम जानबा कांबळे, शेतकी खात्याचे संचालक हेरॉल्ड एच. मॅन, मिशनमधील त्यांचे सहकारी पी.बी. गोठस्कर, एल.बी.नायक आणि के.रंगराव या सर्वांची चांगली साथ होती. मिशनच्या या कार्यात मोठ्या कौशल्याने त्यांनी ब्रिटीश अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांना सहभागी करून घेतले होते. पुण्यातील हेरॉल्ड एच. मॅन व मुंबई विभागाचे प्रभारी गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क हे तर या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याशी पूर्णपणे एकरूप झाले होते. मिशनच्या कार्याची माहिती ऐकून गव्हर्नर जनरल आणि त्यांची पत्नी लॉर्ड व लेडी हार्डिंग्ज यांनी २००० रूपयांची देणगी मिशनला दिली. अशाप्रकारे मिशनचे कार्य सुरू राहण्यासाठी सर्वांचे अखंडितपणे प्रयत्न चालू होते.

मिशनच्या कार्याचा विस्तार व व्याप पुढे बराच वाढला आणि अस्पृश्योध्दाराचे ध्येय साध्य होऊ लागले. दि.५ ते ७ ऑक्टोबर १९१२ रोजी पुणे येथे म.शिंदेनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची महाराष्ट्र परिषद भरवली. यामध्ये स्पृश्य-अस्पृश्य जातींचे पुढारी हजर होते व जवळजवळ ४०० लोकांचे सहभोजन यावेळी करण्यात आले. या परिषदेत प्रा.लक्ष्मणशास्त्री लेले, महार नेते गणेश अक्काजी गवई, बी.एस.कामत, गोपाळराव देवधर, भंगी नेते नाथ महाराज, प्रा.जी.सी.भाटे, हरीभाऊ लिमये आणि भास्करराव जाधव हे सर्व स्पृश्य-अस्पृश्य अस्पृश्यांच्या सर्वांगिण उन्नतीबद्दल बोलले. यासाठी सर्वांच्याच एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.[४] या परिषदेमध्ये महिलांची स्वतंत्र सभा घेण्यात आली. यामध्ये २०० स्त्रिया अस्पृश्य वर्गाच्या व ५० स्त्रिया इतर समाजाच्या होत्या. सभेचे अध्यक्षपद न्या.रानडेंची पत्नी लेडी रमाबाई रानडे यांनी भूषविले. अस्पृश्य महिलांनी या परिषदेत आपल्या परिस्थितीसंबंधी केवळ भाषणच दिले नाही तर पेपरही वाचून दाखविले. स्पृश्य महिलांनी सहभोजनाच्या कार्यक्रमासाठी स्वयंपाक बनविण्यास पुढाकार घेतला. 'महार, मांग, चांभार, ढोर, भंगी, ब्राम्हण, मद्रासी, ब्राम्हो, ख्रिस्ती, मुसलमान अशा दहा समाजाचे मुंबई इलाख्यातून, बाहेरच्याही निरनिराळ्या १७ जिल्ह्यातील ५४ गावांतून २६० प्रतिनिधींनी परिषदेत भाग घेतला. जे मुख्य सहभोजन झाले त्यांत ३५० 'अस्पृश्य' वर्गाचे आणि ५० निरनिराळे ब्राम्हणादी वरिष्ठ वर्गाचे लोक एकाच पंगतीस होते.'[५] यावेळी पुणे शाखेच्या मिशनच्या इमारतीसाठी फंड जमा करण्यात आला. इमारतीसाठी पुणे नगरपालिकेने भोकरवाडी येथे सात एकर जागा वार्षिक २ रूपये नाममात्र भाड्याने दिली. तुकोजीराव होळकरांनी त्यासाठी २०,०००/- रू.ची देणगी दिली.[६] पुढे या इमारतीला 'अहिल्याश्रम' हे नाव देण्यात आले.

मिशनच्या प्रतिनिधी मंडळाला प्रतिसाद म्हणून इ.स. १९१० मध्ये मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लर्क यांनी गव्हर्नरच्या कौन्सिलमध्ये एक विधेयक पास करून घेतले त्यानुसार सरकारी अधिकारी व नगरपालिकांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा वाढविण्याचे आदेश दिले.[७] इ.स. १९१३ मध्ये भेटीस गेलेल्या मिशनच्या प्रतिनिधी मंडळाच्या प्रयत्नामुळे तत्कालिन मुंबई प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनी पुण्यातील मिशनच्या अहिल्याश्रम या इमारतीसाठी २०,००० रूपयांचे अनुदान मंजूर केले तसेच औद्योगिक प्रशिक्षण वर्गासाठी व वसतीगृहांसाठी खास अनुदान मंजूर केले.[८] इ.स.१९१३ मध्येच शिंदेंनी मांग, रामोशी, बेरड इ. लोकांसाठी स्वतंत्र शेतकी-वसाहत स्थापन करून त्यांच्यावरील गुन्हेगार जमातीचा शिक्का पुसून टाकण्याची विनंती सरकारकडे केली. लॉर्ड विलिंग्डन यांनी ही विनंती मान्य केली परंतु या महत्वाकांक्षी योजनेसाठी निवडलेली जागा लष्करातील सैनिकांच्या कुटुंबियांसाठी देण्यात आल्याने ही योजना फलद्रुप होऊ शकली नाही.

इ.स.१९२४ मध्ये त्रावणकोर संस्थानच्या वायकोम या गावी तेथील मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून मद्रासमधील एक ब्राम्हणेतर नेते रामस्वामी नायकर यांनी सत्याग्रह सुरू केला. म.शिंदेंनी अस्पृश्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा देऊन त्या ठिकाणाला भेट दिली. तेथील अस्पृश्यांच्या सभांमधून भाग घेतला व समाजजागृती केली. पुण्यात पर्वती मंदिर-प्रवेश सत्याग्रह दि.१३/१०/१९२९ रोजी सुरू झाला. या सत्याग्रहालाही म.शिंदेंचा पाठिंबा होता. या सत्याग्रहाच्या सविस्तर वृत्तांताची 'पर्वती सत्याग्रह व सनातनी उर्फ सैतानी स्पृश्य' नावाची एक छोटी पुस्तिका एस.बी.लांडगे यांनी लिहिली. या पुस्तिकेला लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये म.शिंदे म्हणतात, "परवा सत्याग्रही लोकांना अडथळा करताना 'स्पृश्यांनी' पर्वती टेकडीवर जे काया-वाचा-मने अत्याचार केले त्यांचा निषेध करण्यासाठी पुणे येथे रे मार्केटसमोर जाहीर सभा झाली त्यावेळी मीच अध्यक्ष होतो... अशा (सत्याग्रहाच्या) आणीबाणीच्यावेळी राष्ट्रीय सभेच्या वतीने काही देशभक्त 'असमय मौन' धारण करतात हे त्याहूनही खडतर दुर्दैव- नव्हे राष्ट्रीय दौर्बल्य! मी तर म्हणतो या प्रश्नाचा सोक्षमोक्ष ता.३१ डिसेंबर १९२९ च्या मध्यरात्रीपूर्वीच झाला पाहिजे. हा सत्याग्रह होवू दिला ही म.गांधी आदिकरून आम्हा सर्व स्पृश्यांची चूक झाली. अस्पृश्यता कायम ठेवून हिंदुस्तानने स्वराज्य भोगावयास पुढे सरसावणे म्हणजे सर्व जगाला एक धोका आहे! इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष परमेश्वरालाच आव्हान आहे!"[९] महर्षिंचे हे विचार केवळ अस्पृश्य-मुक्तिच्या चळवळीपुरतेच मर्यादित नसून संपूर्ण मानव-मुक्तीच्या लढ्यासाठी प्रेरणा देणारे आहेत.

अस्पृश्य वर्गात मुरळी वाहण्याची किंवा देवांशी विवाह लावण्याची चाल होती. मुरळी वाहिलेल्या मुलीला पुढे आपले सारे जीवनच अनीतीने, हालअपेष्टेने काढावे लागे. ही हिडीस आणि निंदनीय प्रथा नष्ट व्हावी यासाठी म.शिंदेंनी अनन्य साधारण प्रयत्न केले. केवळ कायद्याने हा प्रश्न सुटणार नाही याची त्यांना जाणीव असल्यामुळे इ.स.१९०७ मध्ये त्यांनी 'पश्चिम हिंदुस्थानातील मुलांचे रक्षण करणारी संस्था' स्थापन केली. या संस्थेत न्या.चंदावरकर, सर भालकृष्ण, एच.आर.वुईल किन्सन, इ. व्यक्ती होत्या. शेतकी खात्याचे संचालक डॉ.मॅन यांनी त्यांना मौलिक सहकार्य केले.

देवाला वाहिलेल्या मुलींप्रमाणेच वाघ्या, आराध्य, पोतराज, जोग्या अशी नावे धारण करून वाममार्गाने बिभत्स जीवन जगणा-या आणि देवाला वाहिलेल्या मुलांनाही वरील संस्थेत आश्रय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या भयावह, विचित्र, विकृत रूढीत सापडलेल्या मुलींना शोधून काढण्यासाठी या संस्थेने दोन इन्स्पेक्टर नेमले. त्यांनी दि.२५ एप्रिल १९१० रोजी जेजूरी यात्रेत व इ.स.१९११ मध्ये मुंबईत मुरळी प्रतिबंधक परिषद भरवली. या कामात त्यांना सातत्याने त्यांच्या भगिनी जनाबाई शिंदे यांनी साथ दिली. तरूण मंडळींची मने वळवून त्यांची होतकरू मुरळ्यांशी रीतसर लग्ने लावून भावी हानीतून मुरळ्यांची सुटका करण्याचे कामही म.शिंदे यांनी केले. एका अस्पृश्य मुरळीचा विवाह खडकी (पुणे) येथे घडवून आणण्यात आला होता त्या विवाहाला ते हजर राहिले होते.[१०]

अस्पृश्यांच्या राजकीय हितसंबंधांचा पुरस्कार करण्यासाठी इ.स.१९१७ मध्ये शिंदेंनी अस्पृश्यता निवारक संघाची स्थापना केली. या संघटनेमार्फतच काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनामध्ये 'अस्पृश्यता निवारणाचा ठराव' पास करून घेण्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला होता. अस्पृश्यांच्या प्रश्नाला राष्ट्रीय पातळीवर नेण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते. या उद्देशानेच काँग्रेसच्या वार्षिक परिषदांच्या वेळी त्यांनी मिशनच्याही परिषदा भरवायला सुरूवात केली. इ.स. १९०७ मध्ये सुरत, १९०८ मध्ये मद्रास, १९०९ मध्ये अलाहाबाद, १९१२ मध्ये बाकीपूर व इ.स.१९१३ मध्ये कराची काँग्रेसच्या वेळी त्यांनी मिशनच्याही परिषदा भरवल्या. अखेर डिसेंबर १९१७ मध्ये कलकत्ता येथे डॉ.ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात अस्पृश्यता निवारणाबद्दलचा ठराव मंजूर करण्यात आला.[११]

दि.२३ मार्च १९१८ रोजी म.शिंदे यांनी महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद' भरवली. या परिषदेस बिपीनचंद्र पाल, जमनादास द्वारकादास, भुलाभाई देसाई, बॅ.जयकर, असे भारतातील बरेच नेते उपस्थित होते. यावेळी एक ऐतिहासिक महत्वाचा ठराव खालीलप्रमाणे मांडण्यात आला.

'निकृष्ट वर्गावर लादलेली ही अस्पृश्यता यापुढे ताबडतोब काढून टाकण्यात यावी व या कार्यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढा-यांनी एक अस्पृश्यता निवारक जाहिरनामा काढून निकृष्ट वर्गास शाळा, कॉलेज, दवाखाने, न्यायकचे-या,

सार्वजनिक खर्चाने चालविलेल्या सर्व सार्वजनिक संस्था तसेच विहिरी, तळी, म्युनिसीपालिटीचे नळ अशा सार्वजनिक पाणवठ्याच्या जागा, सार्वजनिक व्यवहाराची व करमणूकीची ठिकाणे, देवालये यासारख्या सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे प्रतिबंध न लादता पूर्ण मोकळीक द्यावी असे या परिषदेचे मत आहे.'[१२]

हा ठराव पास झाला आणि या मसुद्याचा एक जाहिरनामा तयार करून त्यावर देशातील प्रमुख पुढा-यांच्या सहया घेण्याचा अधिकार जनरल सेक्रटरी या नात्याने म.शिंदे यांना देण्यात आला. जाहिरनाम्यावर सही करणा-या व्यक्तिसाठी एक टीप होती की 'मी खाली सही करणार, ठरावाच्या अटी स्वतः अक्षरशः पाळीन आणि दुस-याकडूनही त्या पाळल्या जातील असा जातीने प्रयत्न करीन'. या ठरावावर सर्वप्रथम गुरूदेव रविंद्रनाथ टागोर यांनी सही केली त्यानंतर वरील प्रतिज्ञापत्रावर सर्व प्रांतांच्या जवळजवळ ३०० प्रमुख पुढा-यांच्या सह्या मिळवण्यात आल्या परंतु लोकमान्य टिळकांनी यावर सही करण्यास नकार दिला.[१३]

पुण्यासारख्या ठिकाणी अस्पृश्य बांधवांचे एक केंद्र व्हावे यासाठी त्यांनी झपाट्याने अहिल्याश्रमाचे बांधकाम पूर्ण केले. या भव्य इमारतीत अस्पृश्यांसाठी शिक्षणकेंद्र, विद्यार्थी वसतीगृह, त्यांना रोजगार मिळवून स्वाभिमानाचे स्वावलंबी जीवन जगता यावे यासाठी उद्योगशाळा असावी अशी उदात्त भूमिका घेऊन म.शिंदेनी ही इमारत उभारली. म.शिंदे यांनी इ.स.१९२३ मध्ये मिशनची सूत्रे खाली ठेवली व मिशनची पुनर्घटना मंजूर करून घेतली. नव्या घटनेत मिशनच्या पदाधिका-यामध्ये दोन तृतीयांश अस्पृश्य असावेत असे ठरले. महार, चांभार, मांग, भंगी, मुसलमान, या वर्गाचे प्रत्येकी दोन व पारशी, मराठा, ब्राम्हण व ब्राम्हणेतर यांचे प्रत्येकी एक असे प्रतिनिधी असावेत अशी व्यवस्था केली. अशाप्रकारे मिशनच्या कार्यातून बाहेर पडल्यानंतरही त्यांचे अस्पृश्यता निवारणाचे कार्य अखंडपणे सुरूच होते. त्यांनी अस्पृश्यतेविषयी मौलीक संशोधनही केले. एके ठिकाणी ते म्हणतात, 'अस्पृश्यतेचा छडा लावण्यात निवारणाचा भाग तर राहू द्या, मला स्वतःला जो अनुभव आला आणि आनंद झाला तो लक्षात घेता मला आणखी जन्म मिळाले तरी ते याच शोधनात आणि सेवाशुश्रूषेत खर्चीन.'[१४]

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे भारताच्या प्रबोधन काळातील योगदान अत्यंत महत्वाचे असून म.जोतीबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महान समाज क्रांतीकारकांच्या कार्यादरम्यानचा एक महत्वाचा दुवा म्हणून त्यांच्या कार्याकडे पाहता येईल. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली. म.शिंदे व त्यांच्या सर्व कुटुंबियांनीच या कार्यासाठी आपले आयुष्य वाहून घेतले होते. एक प्रकारे अस्पृश्यांमध्ये केवळ शैक्षणिक जागृती निर्माण न करता त्यांच्यात स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण करण्याबरोबरच स्पृश्यांबरोबर सलोख्याचे सहजीवन जगण्याचे प्रशिक्षण देण्याचे कार्यही मर्हषि शिंदे व त्यांची निराश्रित सहाय्यकारी संस्था यांनी पार पाडले होते.

**संदर्भ-**


१- वि.रा.शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, वर्ष-१९५८, पृष्ठ क्र.२१६ व २१७
२- वि.रा.शिंदे संपादित थिईस्टिक डिरेक्टरी, थिईझम इन वेस्टर्न इंडिया पृष्ठ ३६-३७
३- डॉ.शंकरराव कदम, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य, पृष्ठ क्र.११५ व ११६
४- वि.रा.शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, पृष्ठ २६१-२६२
५- मा.प.मंगुडकर, गो.मा.पवार व इतर(संपा.), वि.रा. शिंदे, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, पृष्ठ-२३८
६- वि.रा.शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, पृष्ठ २६४ व २७८
७- वि.रा.शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, पृष्ठ २६९
८- वि.रा.शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, पृष्ठ २८०
९- सीताराम बाबाजी लांडगे, पर्वती सत्याग्रह व सनातनी ऊर्फ सैतानी स्पृश्य (व्दितीयावृत्ती ऑक्टोबर २००६), प्रस्तावना-विठ्ठल रामजी शिंदे
१०- डॉ.शंकरराव कदम, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य, पृष्ठ क्र.१६८
११- शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, व्दितीय आवृत्ती-२००४, पृष्ठ क्र.१५
१२- वि.रा.शिंदे, माझ्या आठवणी व अनुभव, पृष्ठ २९३
१३- आर.डी. गायकवाड, आंबेडकर चळवळीच्या आठवणी, पृष्ठ क्र.२२०
१४-मा.प.मंगुडकर संपादीत, शिंदे लेखसंग्रह पहीली आवृत्ती पृष्ठ १२१